# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ

## पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

---

जा.क्र. /मराठी गोविग/ **२९१/२०२६** दिनांक **२४/०९/२०२६**

**मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सन्मान दिनानिमित्य आयोजित राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा**

**दिनांक २८ सप्टेंबर २०२६ वेळ : सकाळी ११:०० वाजता**

**प्रति,**

**मा. प्राचार्य / विभागप्रमुख / विद्यार्थी मित्र-मैत्रिणींना,**

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

**मा. महोदय,**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान, आस्था व आत्मीयता निर्माण व्हावी, मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेची जाणीव व्हावी, तसेच विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्याला व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभागातर्फे अभिजात मराठी भाषा दिन २०२६ निमित्त राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे., यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे, ही विनंती.

**स्पर्धेचे नियम, विषय व स्वरूप**

१. स्पर्धेचे नाव : राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा

२. स्पर्धेचे विषय : खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घ्यावा

– 'मायबोली ते अभिजात मराठी' : भाषेच्या अस्मितेचा प्रवास
– माझं गाव, माझी भाषा
– मराठी भाषा आणि युवकांची जबाबदारी
– My मराठी की माय मराठी
– मराठी भाषेचे भवितव्य : आव्हाने आणि संधी

३. पात्रता : ही स्पर्धा महाराष्ट्रातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.

४. स्पर्धेचे स्वरूप :स्पर्धकाने निवडलेल्या विषयावर जास्तीत जास्त ४ मिनिटांचे वक्तृत्व ऑनलाइन पद्धतीने सादर करावे.

५. माध्यम : स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात येईल. स्पर्धेची ऑनलाइन लिंक नोंदणीकृत विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे पाठविण्यात येईल.

६. भाषेचे माध्यम : वक्तृत्व मराठी भाषेतच असावे.

७. मूल्यांकनाचे निकष : स्पर्धकांचे मूल्यमापन पुढील बाबींच्या आधारे करण्यात येईल.

- विषयाची मांडणी व आशय
- भाषाशैली व मराठी भाषेचा प्रभावी वापर
- वक्तृत्व कौशल्य व सादरीकरण
- विचारांची स्पष्टता व सुसंगती
- प्रभावीपणा व समय मर्यादेचे पालन

८. वेळेची मर्यादा : प्रत्येक स्पर्धकाला ४ मिनिटांचा वेळ देण्यात येईल. निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ घेतल्यास त्याचा परिणाम गुणांकनावर होऊ शकतो.

९. परीक्षकांचा निर्णय : परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.

१०. पारितोषिके : स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या मराठी विभागामार्फत सन्मानचिन्ह दि १३ ऑक्टोंबर २०२६ रोजी गोंडवाना विद्यापीठातील विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल.

११. नोंदणी शुल्क : या स्पर्धेसाठी कोणतेही नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही.

१२. नोंदणी : स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या ऑनलाइन नोंदणी लिंकद्वारे विहित मुदतीत नोंदणी करणे आवश्यक आहे.

१३. सहभागाची मर्यादा :प्रत्येक महाविद्यालयातून मर्यादित विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. अंतिम सहभागाबाबत आयोजकांचा निर्णय राहील.

१४. मौलिकता : वक्तृत्वातील मांडणी विद्यार्थ्याची स्वतःची व मौलिक असावी. इतरांच्या भाषणाची किंवा मजकुराची हुबेहूब नक्कल करू नये.

१५. आचारसंहिता : कोणत्याही जाती, धर्म, पंथ, भाषा किंवा समाजाच्या भावना दुखावतील असा आक्षेपार्ह मजकूर वापरू नये.

१६. ऑनलाइन उपस्थिती : स्पर्धकांनी दिलेल्या वेळेपूर्वी ऑनलाइन मंचावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी स्पर्धकांनी इंटरनेट कनेक्शन, मोबाईल/संगणक, मायक्रोफोन व कॅमेरा यांची पूर्वतयारी करावी.

१७. स्पर्धेची तारीख व वेळ : दिनांक : २८ सप्टेंबर २०२६ वेळ : सकाळी १०.०० वाजता

१८. नोंदणीची अंतिम तारीख : दिनांक : २७ सप्टेंबर २०२६

१९. ऑनलाइन स्पर्धेची लिंक : नोंदणी केलेल्या स्पर्धकांना स्पर्धेची ऑनलाइन लिंक त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर किंवा ई-मेलवर पाठविण्यात येईल.

**आयोजक**

**मराठी भाषा विभाग मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई विद्यापीठ, मुंबई आणि**
**पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**अधिक माहितीसाठी :**

**डॉ. हेमराज निखाडे संपर्क क्र. ८९२८२५४९८३**
सहा. प्राध्यापक पदव्युत्तर शैक्षणिक मराठी विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी लिंक :**

https://forms.gle/SozdQZVWNmpuyE3n6